महासागर
भंडारा
मंगळवार १४ऑक्टोंबर २०२५
पान ३

# वरठी येथे नवनिर्मित कुणबी समाज भवनाचे लोकार्पण व कोजागिरी कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**
**वरठी दि.१३ऑक्टोंबर :** भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी तालुक्यातील वरठी येथे स्थानिक तुमसर- मोहाडी विधानसभेचे आ.राजू कारेमोरे यांच्या निधीतून १५ लाख रुपये मंजूर करत त्या माध्यमातून कुणबी समाजभावनाची निर्मिती करण्यात आली. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्त दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी शनिवारी नवनिर्मित कुणबी समाजभावनाचा लोकार्पणाचा कार्यक्रम पार पडला.



दरम्यान कोजागिरी कार्यक्रम सुद्धा घेण्यात आले. त्यावेळी मोठ्या संख्येने वरठी व परिसरातील कुणबी समाज बांधव सहभागी झालेले पाहायला मिळाले. कार्यक्रमा पश्चात समाज बांधवांनी सहभोजनाचा आनंदही घेतला.

# किरण लोकसंचालित साधन केंद्र वरठीची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१३ऑक्टोंबर :** महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय भंडारा यांच्या मार्गदर्शनाखाली किरण लोकसंचालित साधन केंद्र वरठीची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ग्रामपंचायत सभागृह वरठी येथे उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सौ. संगीता भोंगडे, उपव्यवस्थापक तथा ण्श्रेण सल्लागार, माविम भंडारा यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सौ. माया वैद्य होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्रीमती शैलेजा वाघ, जिल्हा माहिती अधिकारी भंडारा, विशाखा फडणवीस, जिल्हा व्यवस्थापक महामंडळ भंडारा, कु. अपेक्षा बोरकर, आत्मविभाग मोहाडी, एम. डी. डोंगरवर, कृषी अधिकारी मोहाडी, जे. पी. राऊत, उप कृषी अधिकारी मोहाडी, मा. प्रफुल अवघड, माविम भंडारा, भूषण कोरे, जिल्हा प्रकल्प सल्लागार माविम मोहाडी, श्री. गौरव नंदनवार, लेखाधिकारी माविम भंडारा, श्री. सचिन मदणकर, घ्घ्घ्घ बँक, मेश्राम सर, बँक भंडारा व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी



उपस्थित होते.

सभेला अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, सदस्य तसेच विविध स्वयं सहाय्यता गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रास्ताविक गौतम शहारे, व्यवस्थापक वरठी यांनी केले. सचिव वैशाली खांदाळे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. यानंतर प्ञ्इण बँक व घ्घ्घ्घ बँकेमार्फत लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण करण्यात आले.

या वेळी संगीता भोंगडे यांनी महिलांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, कुटुंब अर्थसहाय्य योजना आदींबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी अडचणी आल्यास तहसील कार्यालयाशी थेट संपर्क साधण्याचे आवाहन केले. कृषी विभागामार्फत विविध कृषी योजना तसेच महामंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजना विशाखा फडणवीस यांनी स्पष्ट केल्या. सभेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सहयोगिनी, लेखापाल व उपजीविका सल्लागार यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच काथा वर्क करणाऱ्या महिलांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्मिता रामटेके, सहयोगिनी यांनी केले तर आभार प्रदर्शन अश्मिता वाहने यांनी केले.

# १४ ऑक्टोंबर रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१३ऑक्टोंबर :** जिल्हयातील नोकरीइच्छुक युवक व युवतींकरीता खाजगी क्षेत्रातील नामांकित कंपन्याच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उददेशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र भंडारा आणि शिव कलश बहूउददेशीय संस्था भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी. २.०० या वेळेत संतकृपा सभागृह,स्टेशन रोड,एचपी पेट्रोलपंपच्या बाजूला,प्रगती कॉलनी,भंडारा ता.जि.भंडारा या ठिकाणी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

सदर रोजगार मेळावाची या कार्यालयाकडून व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्यात येत आहे. सदर रोजगार मेळावामध्ये विविध कंपनी / इंडस्ट्रीज / प्लेसमेंट एजन्सीज / औद्योगिक आस्थापना सहभागी होणार असून त्यांचेद्वारा ८१८ रिक्तपदांकरीता जिल्हयातील नोकरीइच्छुक युवक व युवतींना मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

सदर रोजगार मेळाव्यात अनेक कंपनी / आस्थापना सहभागी होणार आहेत. सदर पदे ही दहावी/बारावी/पदवीका/पदवी/पदव्यूत्तर पदवी इ.शैक्षणिक पात्रता असणारे १८ ते ५० वयोगटातील उमेदवार सहभागी होऊ शकतात. सदर मेळाव्यामध्ये मुलाखत व तत्सम प्रक्रीयेद्वारा उमेदवारांची निवड होणार असल्याने उमेदवारांनी बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती व पासपोर्ट फोटोसह मेळाव्याच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे. नोकरीइच्छुक युवक व युवतींनी सदर रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी मेळाव्याच्या दिवशी ऑफलाईन नोंदणी करता येईल. सदर रोजगार मेळावामधील रोजगाराच्या सुवर्णसंधीचा जिल्हयातील अधिकाधीक नोकरीइच्छुक व गरजू युवक व युवतींनी तसेच, गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त गावातील नोकरीईच्छुक उमेदवारांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदवुन रोजगाराच्या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.डॉ.सुधाकर झळके, सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा यांनी केले आहे.

# करडी परिसरात अवैध वाळू चोरांचा धुमाकूळ

## रस्त्यांची ऐशी तैशी

**महासागर प्रतिनिधी**
**मोहाडी दि.१३ऑक्टोंबर :** तालुक्यातील निलज वाळू घाटातून व गोंदिया जिल्हयातील अनेक वाळू घाटातील वाळू भरून टिप्पर करडी व देव्हाडा मार्गे मोठ्या प्रमाणात धावत असून त्यांच्या कडून मोठ्या प्रमाणात हप्ता वसुली सुरू आहे . निलज (बुज) वाळू घाटातून रात्री संधी साधून वाळूचोर वाळू चोरून नेत आहेत . आणि तलाठी , मंडळ अधिकारी मुख्यालय सोडून शहरात राहत आहेत . रात्रीला गस्त घालणारे पोलिस कर्मचारी वाळू चोराकडून खिसे गरम करीत आहेत.



गोंदिया जिल्हयातील डांगुर्ली, अर्जुनी ,घाटकुरोडा, बिलोली अशा अनेक वाळू घाटांवरून मोठ्या प्रमाणात क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरून टिप्पर गुलाबटोला ,नवेझरी येथील तलाठी , मंडळ अधिकारी यांच्या कार्यालया समोरून व करडी पोलिसाच्या हद्दीतून पालोरा , मुंढरी , खडकी , खमारी मार्गे जातात . बरेच वाळू घाट बंद असल्यामुळे नागपूर येथे वाळूला तगडा भाव मिळत आहे . देव्हाडा खुर्द व बुज. मार्गे माडगी , खापा , जांब , रोहा , दाभा मार्गे व मोहाडी तहसील कार्यालयासमोरून वाळूचे टिप्पर मोठ्या प्रमाणात रात्री धावत असतात .याची माहिती करडी तुमसर , मोहाडी , आंधळगाव , कारधा पोलिसांना आहे , परंतु हप्ता वसुली मुळे सर्व कार्य सुरळीत चालू आहे. क्षमतेपेक्षा जास्त वाळू घेऊन टिप्पर रस्त्याने धावत असल्याने रस्ते फुटलेले आहेत.रस्त्याने जाणा?्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या भागात रात्री ७ वाजेपासून सकाळी ५ वाजे पर्यंत वाळू घेऊन जाणा?्या टीप्पराची वर्दळ सुरू असते.

मोहाडी तहसीलदारांनी अवैध वाळू चोरीवर आळा बसावा म्हणून रात्र गस्तीसाठी पथक नेमले आहेत , मात्र या पथकातील कर्मचारी आपले हात पिवळे करून घरी झोपा काढतात . त्या पथकातील कर्मचा?यावर एका चालकाचे वचक असून तो चालक वाळू चोरांच्या संपर्कात राहतो. पथक कुठे जाणार कुठे येणार कोण कोण आहेत याची माहिती तो वाळू चोरांना आधीच देतो . त्या बदल्यात त्याला हप्ता दिला जातो. तहसीलदार यांना वाळू चोरीची माहिती देण्यास प्रातिष्ठित लोकांनी फोन केले तर त्यांचे फोन उचलत नाहीत . या प्रकारामुळेच वाळू चोरीवर आळा आणणे कठीण आहे.

# कोहळी समाज सामूहिक कोजागिरी

## आ.नानाभाऊ पटोले यांची उपस्थिती. ; समाजातील मान्यवर ही उपस्थित



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१३ऑक्टोंबर :** कोहळी समाज भवन सेंदुरवाफा येथे कोहळी समाज सामाजिक कल्याणकारी संस्था, सेंदुरवाफा यांच्या वतीने आयोजित कोजागिरी कार्यक्रमानिमित आमदार श्री नानाभाऊ पटोले , प्रकाशभाऊ बाळबुदे माजी जिल्हा अध्यक्ष भाजपा, रवि परशूरामकर, श्रावण पाटील बोरकर , गजानन डोंगरवार, अशोक कापगते, मनीष कापगते, बालकृष्ण लंजे , सौ. प्रीती डोंगरवार, सौ. पुष्पा कापगते व सामाजिक कल्याणकारी संस्थेच्या सर्व सदस्य व मोठ्या संख्येने कोहळी समाज बांधव उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी कोजागिरी निमित्त शुभेच्छा दिल्या.

# सार्वत्रिक निवडणुक २०२५ नगर परीषद भंडारा च्या प्रारुप मतदार यादीवर आक्षेप

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१३ऑक्टोंबर :** राज्य निवडणुक आयोगाचे आदेशाने स्थानिक स्वराज्य संस्थेचे सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येत आहेत करीता नगर परीषद भंडारा नविन प्रभाग रचना व सिमांकन करण्यात आलेले आहे. त्यानुसार नगर परीषद भंडारा येथील प्रारुप मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात मतदाराची नावे एका प्रभागतून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट झालेली आहेत, बरेचशे नावे सुटलेली आहेत तसेच ज्या प्रभागात रहिवासी आहेत त्यांची नावे ज्या प्रभागाचा रहिवासी नाही अशा प्रभागात घातलेली आहेत. असे सर्वच



प्रभागात मोठ्या प्रमाणात मतदाराच्या यादीमध्ये अदलाबदल झालेली आहे. याबाबत स्थानिक स्तरावर चौकशी करुन फेरतपासणी करण्यात यावी तसेच या आक्षेपाच्या अनुषंगाने पुर्ण चौकशी झाल्याशिवाय अंतीम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येवू नये अशी भंडारा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे शहर अध्यक्ष हेमंत महाकाळकर व पदाधिकारी यांनी मागणी केलेली आहे. याप्रसंगी उपस्थितांमध्ये सरिता मदनकर, डॉ. रविंद्र वानखेडे, मनिष वासनिक, मो. मुस्ताक बल्लीभाई, सुनिल साखरकर, जुगल भोंगाडे, उमेश ठाकरे, प्रदिप सुखदेवे, राजु पटेल, जुमालाताई बोरकर, लोकेश खोब्रागडे, विजय खेडीकर, राजु शक्तीकर, संजय वरगंटीवार, अरुण अंबादे, विपुल रोडगे, नरेंद्र खोब्रागडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# माणिकराव सुखदेवे विद्यालयातील विद्यार्थ्याचा चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१३ऑक्टोंबर :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई द्वारा आयोजित इंन्टरमिडीएट श्रेणी चित्रकला परीक्षा व एलीमेन्ट्री चित्रकला श्रेणी परीक्षेत माणिकराव सुखदेवे विदयालय अशोकनगर, फुलमोगरा विदयालयाचा शंभर टक्के निकाल लागला. विद्यालयातील एेलिमेंटरी चित्रकला परीक्षेला १८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

परीक्षेत १८ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटर्मिडीएट चित्रकला परीक्षेत २६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. परीक्षेत २६ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्याचा विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल घोल्लर यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्याच्या यशस्वीतेसाठी सचिव अनंत डुंभरे, प्रकाश चौधरी, मुख्याध्यापक सुनिल घोल्लर, गजानन लिचडे, ईश्वरदास लाखडे, श्रावण चव्हाण, प्रतिभा जीभकाटे, जयश्री घोल्लर, रश्मी खोब्रागडे,



स्वाती निकोसे, चंचल डुंभरे, राजेश मेश्राम, देवा वाट, धनंजय सेलोकर आदिनी अभिनंदन केले आहे.

# कवीसंमेलनाच्या माध्यमातून झाडीबोलीचा वर्धापन दिन साजरा

## झाडीबोली उमरी शाखेचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१३ऑक्टोंबर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी, स्व.इंदिराबाई कापगते यांची जयंती व बोलीमहर्षी डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून झाडीबोली शाखा उमरीच्या वतीने दि.११ आक्टोबर २०२५ रोजी संतकवी डोमाजी कापगते यांच्या निवासस्थानी झाडीबोलीचा ३४ वा वर्धापन दिन कवीसंमेलनाच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष संत डोमाजी कापगते होते. प्रमुख अतिथी म्हणून कवी सुभाष धकाते, वामन पात्रीकर, सुशीला लांजेवार, घनश्याम लंजे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कवी संमेलनात संत डोमा कापगते यांनी ‘ निर्जीव ही वेळूची काठी, आहे मजला आधार’ व ‘झाडीपट्टीचा शिल्पकार हा’ अशा दोन कविता ऐकवून डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांना शुभेच्छा दिल्या.सुभाष धकाते यांनी




‘किती सांगू आई तुला समजावून ’ ही मुलगा मुलगी भेदभावावर कविता सादर केली. सुशीला लांजेवार ’यांनी हात जोडूनी मुजरा करते’ ही कविता सादर केली. वामन पात्रीकर यांनी ’ मातृभाषा आहे माझी, प्राचीन झाडीबोली, घनश्याम लंजे यांनी ‘जन्माला आला आहेस, थोडे जगून बघ’, शितल कापगते हिने ‘कष्ट सहन करते ती स्त्री’, ताराचंद कापगते यांनी डॉ. बोरकर यांची ‘त्या जन्मात, या जन्मात’ अशा कविता ऐकवून कार्यक्रमात रंगत आणली. सुमन पात्रीकर यांनी ‘माझ्या सावित्रीचे देणं’, हिराबाई गिऱ्हेपुंजे यांनी ‘ विठेवरी उभा हरी’, उषा धकाते यांनी ’भारत देश महान’, वासुदेव लंजे यांनी ‘गरूड वाहना नारायणा’ अशा भक्तीगीतांच्या माध्यमातून उपस्थितांची वाहवा मिळविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ताराचंद कापगते यांनी केले. यशस्वीतेसाठी आशा कापगते, निकीता कापगते, तिलोत्तमा कापगते, योगिता कापगते, विठ्ठलपंत कापगते, गिंतीराम कापगते, भूषण कापगते, हेमंत कापगते, हुपेश कापगते आदींनी सहकार्य केले.

# पोटट्यांनो अभ्यासातील मेहनत हेच तुमच्या यशाचे गमक आहे - नितेश कराळे

**महासागर प्रतिनिधी**
**तुमसर दि.१३ऑक्टोंबर :** विद्यार्थ्यांनी वर्गाने आजच्या आधुनिक काळात तंत्रज्ञानासोबत संस्कार, मूल्ये आणि कष्ट यांचा संगम साधला पाहिजे. हाच खरा यशाचा मंत्र आहे असे प्रतिपादन फिनीक्स अकॅडमी वर्धाचे चे संचालक प्रा.नितेश कराळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना केले.



आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळावा या उद्देशाने आज तुमसर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष तुमसर शहर च्या वतीने ‘ विद्यार्थी व युवक मार्गदर्शन सोहळा’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. नितेश कराळे सर यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, स्पर्धा परीक्षांची तयारी, आणि जीवनमूल्याविषयी आणि अन्यायाच्या विरोधात आपली न्यायिक बाजू मांडण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देश ठरवून आत्मविश्वासाने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. प्रा.कराळे पुढे म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ गुण नव्हे, तर दृष्टीकोन, प्रयत्न आणि संयम हेच यशाचे खरे आधार आहेत. जीवनात मोठं व्हायचं असेल तर तीन गोष्टी कायम लक्षात ठेवा त्या म्हणजे ध्येय ठरवा: स्वत:चा मार्ग स्वत: तयार करा. इतरांशी तुलना न करता आपल्या क्षमता ओळखा. कष्ट आणि शिस्त: शॉर्टकट नाही, तर सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वास हाच यशाचा महामार्ग आहे.

**सदगुण आणि संस्कार:** बुद्धिमत्ता महत्वाची आहेच, पण चांगला माणूस होणं अधिक महत्वाचं आहे. नम्रता, आदर आणि सहकार्य हीच खरी शिक्षणाची ओळख आहे.

**प्रत्येक अपयश ही यशाची पायरी आहे:** आत्मविश्वास ठेवा, प्रयत्न करत राहा आणि आयुष्यात स्वत:चं यशस्वी उदाहरण घडवा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रा. कराळे सरांनी सविस्तर उत्तरे देऊन मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन सोहळ्यास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व युवक उपस्थित होते. कार्यक्रमाला शहरातील करिअर अकादमी चे संचालक रवी वाघमारे ,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष चे पदाधिकारी गौरव नवरखेले, विजयश्रीताई वाघमारे, रानी ताई ढेंगे, मिनलताई कारेमोरे, नितेश मारवाडे, गीतेश ठोंबरे,विजय रहांगडाले, तालुकाध्यक्ष छोटु भाऊ तुरकर, अनिल जिभकाटे ,मेहताबसिंग ठाकूर, जवाहर कुंभलकर,शहर अध्यक्ष हेमराज नागफासे, अरुण मोखारे,योगेश रंगवाणी, शेखर बिसेन,अविनाश उपरीकर, उमेश बघेले,भाऊलाल बांडेबुचे, फुकट हिंगे,प्रवीण कहालकर, अजय बडवाईक, सोनाक्षी बडवाईक, डॉ. घनश्याम मडावी,हेमंत मलेवार, राजू बडवाईक, नावेद शेख, सागर बिसने, विनोद उपरीकर,सचिन बडवाईक, प्रदीप हुड, किशोर माटे,सुशांत देशमुख, सोहनलाल हट्टेवार, रिनाताई माटे, सुलभाताई हटवार, बालचंद बोंद्रे, शालुताई वहाने, सानियाताई घोडीचोर, पंकज राठोड,राकेश कोहाड, राकेश भेलावे,मानापूरे, मुकेश वाघमारे सर, रवी समरीत, ॲड योगेश आजापुजे, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# कार्यालय नगरपरिषद , भंडारा

**जावक क्र .नपभं/मुअ/बांध .४०३४/२०२५ दिनांक १०/१०/२०२५**

**बांधकाम विभाग**

**निविदा सुचना**

मुख्याधिकारी ,नगर परिषद,भंडारा यांच्या वतीने नगर परिषद निधी अंतर्गत कामाकरीता बी-१ नमुन्यात दोन लिफाफा पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडून टक्केवारी दराची निविदा मागविण्यात येत आहे.

**निवीदेचा तपशिल**

| | |
|---|---|
| कोरे निविदा फार्म विक्री करण्याचा दिनांक | दि.१३/ १०/२०२५ते २३/१०/२०२५ चे सायं ५.००वाजता पर्यंत |
| दोन लिफाप्यामध्ये हार्ड कॉपी सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.२४/१०/२०२५सायं ५.००वा. पर्यत |
| तांत्रिक बाबीचा लिफाफा क्र.१उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास ) | दि.२७/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| वित्तीय बोलीचा लिफाफा उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास ) | दि.२८/१०/२०२५ दुपारी १.००वाजता |

**टिप :- १) निविदा संबधाने आवश्यक अटी व शर्ती न.प.कार्यालयात बांधकाम विभागात पहावयास मिळतिल. २) निविदेसोबत कोणतीही शंका असल्यास इच्छूक निविदाधारकांनी न.प. कार्यालयात संपर्क साधावा.**

**(श्री.करणकुमार चव्हाण )**
**मुख्याधिकारी ,नगर परिषद, भंडारा.**

महासागर भंडारा

मंगळवार १४ऑक्टोंबर २०२५

पान ६

# औद्यागिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन तंत्रज्ञान अभ्यासक्रम सुरु

**भंडारा :** राज्याच्या कौशल्य विकास रोजगार उद्योजकता विभागाकडून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत भंडारा जिल्ह्यातील शामराव बापू कापगते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था साकोली येथे सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) न्यू एज कोर्सकरिता ऑगष्ट महिन्यापासून प्रवेश प्रक्रिया सुरु होणार आहे. या अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था साकोली येथे संपर्क करून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विजय लाकडे यांनी केले आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**गोंडउमरी दि. १३ऑक्टोंबर :** बोळदे / सा येथे अशोक सम्राट बुद्ध विहार बोळदे /सा वतीने मोठ्या उत्साहात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला .कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश रंगारी .सचिव. राम रतन लांडे उपाध्यक्ष .विजय राऊत एकनाथ भैसारे अनिरुद्ध रंगारी व समस्त बुद्ध बाधव याचे हस्ते कार्यक्रम करण्यात आले .विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी गावकऱ्यांनी सहभाग घेतला तसेच भोजनदान करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक रतन लांडे यांनी केले आभार जगदीश रंगारी यांनी मानले .

**महालगाव :** महालगाव सुकळी येथील त्रिरत्न बुद्ध विहार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला .या ठिकाणी उपस्थित मान्यवर भारतजी शेंडे माजी पोलीस पाटील तथा तंटामुक्त अध्यक्ष महालगाव ,घनश्याम वालोदे माजी उपसरपंच ,गिरधारी खरकाटे विविध सेवा सहकारी संस्था महालगाव यादवराव गजभिये राकेश वालोदे संदिप राऊत नरहरी वालोदे रेखाबाई गजभिये वंदना वैद्य ,सुजता वालोद प्रतिमा वालोदे ,अर्चना गजभिये यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर मार्गदर्शन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक घनश्याम वालोदे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुजाता गजभिये यांनी केली

# साकोली नगरपरिषद भ्रष्टाचाराची चौकशी मुंबई मंत्रालयातून

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १३ऑक्टोंबर :** साकोली सेंदूरवाफा नगरपरिषद मध्ये सन २०१७ ते २०२२ या काळात एकुण किती करोडोंच्या संख्येने विकास निधी नगरविकास विभाग मंत्रालयाने येथे दिली. व त्यातून काय विकास झाला. कारण येथे शून्य ही विकासाचा पत्ता नाही. मग सर्व कोट्यवधी रुपये अखेर गेले कुठे. ? याची पारदर्शक उच्च स्तरीय चौकशी करा व दोषींवर कारवाई करण्यासाठी साकोलीचे पत्रकार थेट मुंबई मंत्रालयात जाऊन नगरविकास विभाग मुख्य अप्पर सचिव डॉ. के. एच. गोविंदराज ( भाप्रसे ) नगरविकास विभाग मंत्रालय यांना ( गुरू. ०९ ऑक्टों.) ला चौकशीसाठी पत्र लाऊन आले. साकोलीला प्रथमच २०१६ मध्ये नगरपरिषदेचा बहुमान मिळाला. २०१७ ला कार्य सुद्धा सुरू झाले. परंतू निवडणुकीत सत्ताधारी लोकांनी येथील सामान्य जनतेला 'आम्ही स्मार्ट शहर' बनवू असे १२ विकासाचा जाहिरनामा वाटून जनतेचा मूर्ख बनवून मतदार जनतेची फसवणूक करण्यात आली. येथे आतापर्यंत कोट्यवधी रुपये येऊनही साधे मुत्रीघर बांधू शकले नाही मग संपूर्ण पैसा गेला कुठे. ? यावर साकोली नगरपरिषद जि. भंडारा येथे सन २०१७



पासून एकुण किती विकास निधी देण्यान आला. व कोणता विकास केला याची उच्च स्तरीय चौकशी करण्याबाबत आशिष चेडगे यांनी थेट मुंबई मंत्रालयात चौकशी पत्र लावले. यात नमूद केले आहे की, येथे सन २०१७ पासुन मुख्याधिकारी राहूल परिहार यांच्या काळापासून एकुण विविध योजनेत एकंदर आपणातर्फे किती कोटींचा विकासनिधी मंजुर करण्यात आला. कारण प्रत्येक जनता विचारत आहे, की विकासमिधी आलाच नाही का? कारण साकोली येथे नगरपरिषद काळात एकही शौचालय काय तर साधे मुत्रीघर बांधू शकले नाही. मग हा आलेल्या सर्व निधी सन २०१७, २०१८, २०१९ (कोविड-१९) वगळता २०२१, २०२२ मधील आलेला सर्व विकासनिधींचे पैसे अखेर गेले कुठे? येथील नगर परिषद २०१७ ते २०२२ पर्यंत एकुण आपल्या विभागामार्फत किती कोटींचा निधी मंजुर करून खात्यात वळता झाला. व त्या पैशांचे अखेर केले काय? की आजही एक विकासाचा पत्ता नाही. यातील जे दोषी आहेत त्यांची तातडीने चौकशी करावी, असे पत्र मुंबईत नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई अप्पर मुख्य सचिव डॉ. एच. के. गोविंदराज यांना दिले. याप्रसंगी त्यांनी संपूर्ण आलेले वृत्तपत्र बातम्यांची फाईल आणि काही माहिती अधिकार नगरविकास विभाग मंत्रालय उपसचिव अनिरुद्ध व्यं जेवळीकर, विशेष कक्ष अधिकारी अनिल एच. मुळे व अप्पर मुख्य सचिव यांचे कक्षाधिकारी अविनाश शितोळे यांना सादर केले आहेत.

# सेदुरवाफा टोल नाका परिसरात भीषण अपघात

## उत्तरप्रदेशातील युवक ठार; वेस्ट बंगालच्या ट्रकचालकावर गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १३ऑक्टोंबर :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर सेदुरवाफा टोल नाक्याजवळ रविवारी रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. डिझेल भरण्यासाठी थांबलेल्या ट्रकला मागून भरधाव ट्रकने जबर धडक दिल्याने हा प्रकार घडला. मृतकाची ओळख शादीक अली (वय ३५, रा. पिपरगड्डी, ता. डुमरीयागंज, जि. सिध्दार्थनगर, उत्तरप्रदेश) अशी करण्यात आली आहे. अपघातात तो ट्रकच्या मागील टायरखाली चिरडला गेला.

घटनास्थळावरील माहिती नुसार, फिर्यादी सिराज कलिममुल्ला खान (वय २०, रा. पिपरगड्डी, ता. डुमरीयागंज, जि. सिध्दार्थनगर, राज्य-उत्तरप्रदेश) हे मृतकासह ट्रक क्रमांक CG ०४ HX ९३२६ मध्ये डिझेल भरत होते. त्या वेळी मागून भरधाव वेगाने येणारा ट्रक क्रमांक WB ३३ E ४६२४ चा चालक बरुनकुमार सरमाई सानटा (वय ४८, रा. मदनापुर, वेस्ट बंगाल) याने निष्काळजीपणाने आपले वाहन चालवत मागील ट्रकला धडक दिली.

या धडकेत शादीक अली हा गंभीररित्या जखमी होऊन जागीच ठार झाला.

या घटनेनंतर साकोली पोलिसांनी फिर्यादीच्या तोंडी अहवाला वरून आरोपी ट्रकचालका विरुद्ध अप. क्र. ५७१/२०२५ अंतर्गत कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं. २०२३ सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष बोरकर, पो.स्टे. साकोली यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ग्रामीण भागात रोजगाराची वनवा; तालुक्यातील युवकांचे रोजगाराच्या शोधात शहरांकडे पलायन

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर दि. १३ऑक्टोंबर :** तालुक्यातील युवकांना स्थानिक पातळीवर पुरेसे व चांगले रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे येथील तरुण मोठ्या संख्येने रोजगाराच्या शोधात शहर आणि महानगरांकडे धाव घेत आहेत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही गावी नोकरीची संधी नसल्याने लाखांदूरसह ईतर गावातील तरुणाई मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत असल्याचे चित्र आहे.

**मुख्य समस्या रोजगाराचा अभावः**

लाखांदूर तालुका हा मुख्यत्वे शेतीवर आधारित आहे. शेतीत मिळणारे उत्पन्न आणि उपलब्ध काम हे कायमस्वरूपी व पुरेसे नसते. तसेच, तालुक्यात मोठे उद्योगधंदे, कंपन्या किंवा सरकारी नोकरीच्या संधी मर्यादित आहेत. परिणामी, उच्च शिक्षण घेतलेल्या आणि कौशल्ये असलेल्या तरुणांना आपल्या बुद्धीनुसार किंवा पात्रतेनुसार काम मिळत नाही.

**शहरांचे आकर्षण आणि कारणेः**

शहरांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, उत्तम शैक्षणिक सुविधा आणि जीवनमानाचा स्तर उंचावण्याची संधी मिळते. याच आकर्षणातून लाखांदूरचे तरुण पुणे, मुंबई, नागपूर, आणि अन्य मोठ्या शहरांत नोकरीसाठी स्थलांतर करत आहेत.

**उत्तम नोकरीच्या संधीः** शहरांत विविध क्षेत्रांत नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. **उच्च वेतनः** ग्रामीण भागापेक्षा शहरांत वेतनाचे प्रमाण अधिक असते. **चांगल्या सुविधाः** आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि मनोरंजनाच्या चांगल्या सुविधा शहरांत उपलब्ध आहेत.

**ग्रामविकासावर परिणामः**

युवकांच्या या स्थलांतरामुळे ग्रामीण भागातील मनुष्यबळ शहरांकडे खेचले जात आहे. गावात केवळ वृद्ध आणि महिलाच मोठ्या संख्येने शिलूक राहत आहेत. यामुळे ग्रामविकासाच्या योजनांवर आणि शेतीच्या कामांवर नकारात्मक परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

**शासनाच्या प्रयत्नांची अपेक्षाः**

स्थानिक पातळीवर युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी शासनाने लाखांदूर तालुक्यात लघु उद्योग, प्रक्रिया उद्योग किंवा कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या तरच हे स्थलांतर थांबेल आणि गावांचा विकास साधता येईल.

# एकलारा येथील बंधारा दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे

## शेतकऱ्याची तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि. १३ऑक्टोंबर :** तालुक्यातील एकालारा (रीठी) येथील नायमुख नाल्यावर असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम एका मजूर संस्था चालकाने निकृष्ट दर्जाचे केले असल्याने या संबंधीची तक्रार शेतकरी सुनिल मेश्राम यांनी जिल्हाधिकारी , शिक्षण व बांधकाम सभापती नरेश ईश्वरकर , कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग जी. प. भंडारा यांच्याकडे केली आहे. लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत २७०५ को. प. बंधारा गैरआदिवासी योजना सन २०२४-२५ अन्वये मौजा एकलारा येथे को. प. बंधारा दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले.

सदर काम १५ लाख ६० हजार ९९३रुपये अंदाजपत्रकाचे आहे. हे बंधारा दुरुस्तीचे काम कांताबाई मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था तुमसर यांनी केले आहे. या कामामध्ये बंधाऱ्याच्या समोर गायमुख नाल्याच्या दोन्ही किनाऱ्या लगत दोन भिंत (वाल) बनवून त्यांच्यावर दगडांची पीचींग करायची होती,

परंतु या कंत्राटदाराने शाखा अभियंता व उपविभागीय अभियंता यांच्या आशीर्वादाने अंदाजपत्रकाला न जुमानता अल्प प्रमाणात लोहा , धूळ मिश्रित गीट्टी, कमी किमतीचा सिमेंट वापरून त्याच नाल्यामधील काळी माती मिश्रित वाळू वापरून कमी लांबी, रुंदी, उंचीच्या भिंती (वाल) तयार केल्या. अशिक्षित अडानी ज्यांचा विमा काढलेला नाही, अशा मजुरांच्या हाताने ओबड - धोबड काम केले. त्याच नाल्या मधील वाळू वापरून या कंत्रादारांने शासनाचा महसूल बुडविला आहे.

जुन्या पिचींगचे नाल्या मध्ये अस्ताव्यस्त पसरलेले दगड जमा करून या ठेकेदाराने पिचींग केली. ती पीचिंग पहिल्याच पावसात वाहून गेली. या बोगस कामात आपले पितळ उघडे पडू नये म्हणून या ठेकेदाराने



अधिकाऱ्याच्या पाठिंब्याने वित्त विभागात खोटे - नाटे सांगून बिल (पैसे) उचलून टाकले आहे. १५ लाख रुपयाचे काम या ठेकेदाराने ४ ते ५ लाख रुपयामध्ये गुंडाळून आपले खिसे गरम करून शासनाला चुना लावला आहे. संबंधित विभाग हा सर्व प्रकार उघड्या डोळ्याने पाहून ठेकेदाराची पाठराखण करीत आहेत. काही शेतकऱ्यांनी बंधारा दुरुस्तीचे काम बोगस सुरू असल्याने त्या ठिकाणी असलेल्या ठेकेदाराला चांगले मजबूत काम करा असे म्हटले असता , त्या ठेकेदाराने त्या शेतकऱ्यांना मुजोरी सांगून त्यांना हाकलून लावले. शासन शेतकऱ्यासाठी सिंचानाची सोय व्हावी म्हणून दरवर्षी बंधारे बांधण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च करते , मात्र ज्यांच्याकडे हा पैसा खर्च करण्यासाठी येते तेच अधिकारी ठेकेदारांना हाताशी धरून बोगस कामे करून अर्धाअधिक पैसा आपल्या घशात घालतात. त्यामुळे जिकडे - तिकडे बोगस कामे होत आहेत.

एकलारा येथील बंधारा दुरुस्तीचे काम करणाऱ्या कांताबाई मागासवर्गीय मजूर सहकारी संस्थेला काळ्या यादीत टाकून त्या संस्थेने उचललेला बिल (पैसा) परत घेण्यात यावा व त्या बोगस बंधारा दुरुस्ती कामाची चौकशी करून जे-जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सुनिल मेश्राम यांनी जिल्हाधिकारी , कार्यकारी अभियंता ल. पा. विभाग भंडारा यांच्याकडे केलेल्या तक्रारीतून केली आहे.

**बंधाऱ्याची तीनदा दुरुस्ती**

तत्कालीन आ. राम आस्वले यांच्या कार्यकाळात गायमुख नाल्यावर कोल्हापुरी बंधारा बांधन्यात आला होता.

काही वर्षानंतर एका बाजूने बंधारा फुटला त्या नंतर दुरुस्त करण्यात आला. पुढे बंधारा सुरळीत असतानी पैसे कमावण्याच्या उद्देशाने लघु पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांनी बंधारा दुरुस्तीचे अंदाजपत्रक बनवून दोनदा बंधारा दुरुस्त केला व आपले खिसे गरम केले.

# कटकवार विद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा

## दुर्मिळ पक्षी सारस व गिधाड चित्रकला स्पर्धा, स्वच्छता अभियान व पक्षीनिरीक्षण कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १३ऑक्टोंबर :** येथील कृष्णमुरारी कटकवार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय साकोली येथील पर्यावरण सेवा योजना तसेच इको क्लब फॉर लाईफ मिशन व राष्ट्रीय हरित सेना यांच्या अंतर्गत असलेल्या जयंत कटकवार ग्लोबल नेचर क्लब तर्फे वन्यजीव सप्ताह निमित्ताने दुर्मिळ सारस व गिधाड पक्षी चित्रकला स्पर्धाचे आयोजन तसेच स्वच्छता अभियान आणि नवतलाव परिसरात तसेच जैवविविधता उद्यान साकोली येथे पक्षी तसेच जैवविविधतेचे निरीक्षण करण्यात आले.

वन्यजीव सप्ताह व स्वच्छता पंधरवाडा तसेच दुर्मिळ सारस व गिधाड पक्षी यांवर विस्तृत माहिती नेचर क्लब संघटक प्रा. अशोक गायधने यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

दुर्मिळ सारस पक्षी चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मयंक कटनकर, गौरव गोबाडे, सुयोग तरजुले व जिया वल्के यांना तर द्वितीय क्रमांक इयान कवासे तर तृतीय क्रमांक वंश पळसकर यांना प्राप्त झाला.

दुर्मिळ गिधाड पक्षी चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मयंक कटनकर, सुयोग तरजुले व जिया वल्के यांना प्राप्त झाला. द्वितीय क्रमांक वंश पळसकर, गौरव गोबाडे तर तृतीय क्रमांक इयान कवासे यांना प्राप्त झाला.

जैवविविधता उद्यान तसेच नवतलाव परिसरात अनेक पक्षी, फुलपाखरे यांचे दर्शन घडविले व त्याबद्दल ओळख तसेच विस्तृत माहिती दिली .

मुख्याध्यापक बी एस लंजे, यांच्या हस्ते उपक्रमात सहभागी विद्यार्थ्याच्या सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# वर्दीतील 'दर्दी' माणूस! ठाणेदार शिंदे

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर दि. १३ऑक्टोंबर :** तालुक्यातील दिघोरी पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रमोद शिंदे हे केवळ कायद्याचे पालन करणारे अधिकारी नसून, ते 'वर्दीतील दर्दी माणूस' म्हणून दिघोरी परिसरात चर्चेत आहेत. त्यांच्या कर्तव्यनिष्ठे सोबतच, सामान्य नागरिकांप्रमाणे असणारे त्यांचे संवेदनशील मन, यामुळे दिघोरी पोलिस स्टेशनला एक नवी ओळख मिळाली आहे.

ठाणेदार शिंदे यांनी पदभार स्वीकारल्या पासून, पोलिस स्टेशनच्या कारभारात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. नागरिकांच्या तक्रारींकडे केवळ 'गुन्हा' म्हणून न पाहता, त्यामागील सामाजिक आणि वैयक्तिक समस्या समजून घेण्याचा त्यांचा दृष्टिकोन वाखाणण्याजोगा आहे. अनेकदा ते तक्रारदारांना केवळ कायदेशीर मदत न करता, त्यांच्या अडचणींवर मानवी स्तरावर तोडगा काढण्यासाठी



पुढाकार घेतात.

**कर्तव्य कठोर, मन हळवे**


कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत ठाणेदार शिंदे अत्यंत कठोर आणि निःपक्षपाती आहेत.

गुन्हेगारांवर त्यांचा जरब असला तरी, त्यांच्या कामामध्ये एक प्रकारची संवेदनशीलता दिसून येते. विशेषतः महिलांशी संबंधित गुन्हे, कौटुंबिक वाद आणि अल्पवयीन मुलांचे प्रश्न हाताळताना ते अत्यंत संयमाने आणि सहानुभूतीपूर्वक वागतात. त्यामुळे, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्याशी संवाद साधणे सहज आणि सुरक्षित वाटते.

**'जनता आणि पोलिस' यांच्यातील दुवा**

ठाणेदार शिंदे यांनी 'पोलिस-जनता' संबंध सुधारण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. ते नियमितपणे जनसंवाद बैठका आयोजित करतात, ज्यामुळे नागरिकांना थेट पोलिस प्रशासनाशी संवाद साधता येतो. पोलिसांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांचा हा प्रयत्न खूप महत्त्वाचा ठरत आहे.

यामुळेच, दिघोरी परिसरात ठाणेदार शिंदे यांना एक आदर्श अधिकारी आणि समाजाचा आधारवड म्हणून ओळखले जात आहे. ते खऱ्या अर्थाने सिद्ध करतात की, खाकी वर्दीमध्येही एक दर्दी आणि संवेदनशील माणूस दडलेला असतो, जो कायद्याचे पालन करताना माणुसकी विसरत नाही.



**सार्वजनिक शारदा उत्सव मंडळ, तिड्डी ता. जि. भंडारा.(छाया-दिवाकर मने)**

# एक सुस्वभावी व्यक्तिमत्व - जाधवराव ऋषिजी साठवणे

***सध्या कार्यरत असलेले पद***

***संस्थापक तेली समाज वरवधू सूचक गृफ बिना मूल्य डाटा नोंदणी जिल्हा भंडारा .***

तेली समाजातील उपवर मूलामूलीचे लग्न जूडणे सोयीचे व्हावे, यासाठी तेली समाज वरवधू सूचक गृप तयार करण्यात आलेला आहे. या गृपमध्ये वैयक्तिक प्राप्त झालेले बायोडाटा व फोटो एकत्र्ति करून सदर बायोडाटा गृपमध्ये प्रसिद्ध करण्यात येतात. गृपच्या माध्यमातून आजपर्यंत १००० चे पेक्षा जास्त लग्न जूडलेले आहेत. आणि नियमित कार्य सूरू आहे.

***सहकार्यवाह, संताजी सेवा मंडळ भंडारा***

संताजी सेवा मंडळ भंडारा चे माध्यमातून उपवर मूलामूलीसाठी वरवधू परिचय मेळावा घेवून ऋणानुबंध वरवधू परिचय पुस्तकाचे दरवर्षी प्रकाशन करण्यात येत असते. तसेच समाजातील होतकरू प्राविण्य प्राप्त मूलामूलीना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात येते .आरोग्य शिबीराचे आयोजन तसेच कोजागिरी, तिळसंक्रात निमिताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

***संस्थापक अध्यक्ष,***

भंडारा जिल्हा सेवानिवृत्त महसूल अधिकारी कर्मचारी सन्मित्र मंडळ भंडारा .

***स्थापनाः सन२०१७***

महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अप्पर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, महसूल अधिकारी, तलाठी, लिपीक यांचे संघटन तयार करण्यात आलेले आहे.

सेवानिवृत्त झाल्यानंतर अधिकारी ,कर्मचारी सोयीच्या ठिकाणी राहण्यास जातात. त्यामुळे संपर्क तुटतो. हीच बाब लक्षात घेवून वर्षातून एकदातरी भेट व्हावी. याकरिता वर्षातून एकदा स्नेहमिलन मेळावा घेण्यात येवून ७५वर्षे पूर्ण झाले. त्यांचा सत्कार येत असतो. वाढदिवस साजरे केले जातात. सहलीचे आयोजन करण्यात येते. पेंशन समंधित अडचणीचे निराकरण करण्यात येते.

***सहसचिव , सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र जिल्हा शाखा भंडारा***

सेवारत कर्मचारी यांच्या मागण्याची दखल घेण्यासाठी वेळोवेळी संप, निदर्शने करून शासनाकडून मागण्या मान्य करण्यात येतात.

***सहसचिव, भंडारा जिल्हा सेवानिवृत्ताची कल्याणकारी संस्था भंडारा .***

सेवानिवृत्त कर्मचारी यांचे प्रश्न निकाली काढण्यात येतात. पेंशन दिवस साजरा करणे. वर्षातून एकदा ८० वर्ष पूर्ण झालेल्या पेंशनर्स चा सत्कार करण्यात येत असतो.

***कार्याध्यक्ष, भंडारा जिल्हा जेष्ट नागरिक फेसकॉम भंडारा .***

जेष्ट नागरिक यांना सिनियर सिटीझन कार्ड तयार करून देणे. जेष्ट नागरिक दिन साजरा करणे. थोर व्यक्तिचे जयंती, पूण्यतिथी कार्यक्रम साजरे करणे. जेष्ट नागरिक यांना सोयीसुविधा मिळवून देणे. व त्याचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविणे.

***संस्थापक अध्यक्ष , विदर्भ तैलीक सेवासंघटन भंडारा जिल्हा महाराष्ट्र राज्य.***

तेली समाजातील सेवारत, सेवानिवृत्त कर्मचारी यांचे संघटन तयार करून सदर सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या सेवेचा फायदा समाजास व्हावा . तसेच सदर संघटन सोबत समाजातील यूवा, महिला, पूरूष यांचे तैलीक सेवासंघटन तयार करून समाजाचे उन्नतीसाठी कार्य करणे. समाजातील होतकरू मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे. समाजासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करून मार्गदर्शन करणे.

***तेली समाज कार्य - व धार्मिक कार्य***

सामूहीक विवाह सोहळयात सक्रिय सहभाग. तेली समाजाचे आराध्य दैवत श्री. संत संताजी जगनाळे महाराज जयंती दि. ८ डिसेंबर रोजी साजरी करणे. तेली समाजाने आयोजित जिल्हयातील व बाहेर जिल्ह्यातील कार्यक्रमास सहकार्य व सक्रिय सहभाग .

४५ वर्षापासून तेली समाजाचे उन्नतीसाठी कार्य .



**जाधवराव ऋषिजी साठवणे**
**राहणार - मोहगांव देवी**
**ह.मू. राजगोपालचारी वार्ड नहर रोड भंडारा**
**शिक्षण-एम.काम, बि.एड**
**नोकरी- शासकीय, महसूल विभाग सेवानिवृत्त धान्य खरेदी निरीक्षक, तथा नायब तहसीलदार**

**मनोगत -** प्रत्येक गावात ,शहरात, तालूक्यात, जिल्हयात ,विभागात तेली समाजाचे संघटन तयार करून तेली समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, उन्नतीसाठी सर्वीनी प्रयत्न करणे आवश्यक आहे

**सुचना :** विदर्भ तैलीक सेवा संघटनसाठी गांवस्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत मजबूत संघटन तयार करून व कार्यक्रम घेवून समाज जागृती होणे आवश्यक आहे. तेली समाजाचे उन्नतीसाठी राजकीय क्षेत्रत लोकसंख्येनूसार भागिदारी होणे आवश्यक आहे. याकरिता तेली समाजाचे ऐक्य जरूरीचे आहे.

धार्मिक कार्यात सक्रिय सहभागः मोहगांव देवी जन्मभूमी येथील श्री. हनुमान मंदिराचे जिर्णोव्दार, गणेशपूरी टोली मोहगांव देवी येथील श्री.हनुमान मंदिराचा जिर्णोव्दार लोकसहभाग घेवून करण्यात आला.

मोहगांव देवी टोली येथे स्वागत गेट तयार करून देण्यात आले. दरवर्षी दहीकाला कार्यक्रमास सहभाग. ४० वर्षापासून तान्हा पोळ्याचे आयोजन गावकरी यांचे सहकार्याने करण्यात येत आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801

महासागर भंडारा

**मालक, मुद्रक, प्रकाशक -** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

